# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Website: www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

जा.क्र.१०/एनजीपी/उन्हाळी सुट्टी /२०१७/ ३३२३
दिनांक : 15 APR 2017

विषय- उन्हाळी सुट्टी शैक्षणिक वर्ष २०१६-१७

सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका ( स्वायत्त तंत्रनिकेतना व्यतिरिक्त इतर ) संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना प्रत्येक वर्षामध्ये ४० दिवस उन्हाळी सुट्टी व २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात येते.

त्या अनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी ( व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या सत्राचा कालावधी लक्षात घेऊन शैक्षणिक, परीक्षा व उत्तरपत्रिका मुल्यमापनाच्या कामासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग थांबवून दिनांक ८.०५.२०१७ ते १६.६.२०१७ पर्यत ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात यावी.

तसेच परीक्षा उत्तरपत्रिका मुल्यमापनाच्या कामासाठी ज्या कर्मचा-यांना थांबविण्यात येईल ते परीक्षेची कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असे ही कळविण्यात येते की, संबधित कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा काम चुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे ही संबधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायतत्ता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या परीक्षेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी सदर सुट्टी ४० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

शिक्षण
15/5

2373 18-5-17

( चंद्रशेखर ओक ) भा.प्र.से
संचालक, तंत्रशिक्षण, म. रा., मुंबई

प्रत- प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर तत्सम पदविका संस्था ( संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत )

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/उन्हाळी सुट्टी/२०१७/ 978
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 21 APR 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित तंत्रनिकेतने, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की उपरोक्त परिपत्राकान्वये कार्यवाही करण्यात यावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.